# पोलीस आयुक्तालय

## मिरा-भाईंदर, वसई-विरार

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

## खुनाच्या गुन्हाची उकल करणा-या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा माहे एप्रिल महिन्यातील उत्कृष्ठ तपासाबाबत मा. पोलीस आयुक्तांचे हस्ते सत्कार.

वालीव पालीस ठाणे येथे मनुष्य मिसिंग क्र. ७५/२०२२ मधील दाखल असलेल्या हरविलेले इसम नामे अमरजी गममीरा बलई वय-४५ वर्षे यांचा खुन करुन दिनांक १२/०४/२०२२ रोजी १२.३० वा च्या दरम्यान बाफाने हद्दीत वासमारे - कामन ब्रिजच्या रोडच्या खड्डयात झाडेझुडपात आरोपीत अमोल राठोड व त्याचे साथीदार यांनी कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन चाकुने वार करुन जिवे ठार मारुन मयताचे प्रेत काळया रंगाचे कॅन्व्हास बॅगेत भरुन पुरावा नष्ट करण्याच्या इराद्याने टाकुन दिले म्हणुन वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४५८/२०२२ भा.दं.वि.स. कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मयताचे प्रेताची बातमी मिळताच व सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून मध्यवर्ती गुन्हे शाखेचे व वालीव पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळी जावुन फिर्यादी व संशयीतांची चौकशी केली तसेच संशयीतांबाबत सखोल माहिती प्राप्त केली. सदर गुन्ह्यातील निष्पन्न आरोपी हे जिल्हा कुलबर्गी राज्य कर्नाटक येथे असल्याची माहिती मिळाल्याने मा. वरिष्ठांचे आदेशान्वये जिल्हा कुलबर्गी राज्य कर्नाटक येथे जावुन अरोपी नामे १) कपित चंदु राठोड वय- २४ वर्षे २) अमोल चंदु राठोड वय- २२ वर्षे ३) लक्ष्मण नानु पवार वय- २४ वर्षे सर्व रा. खनदाळतांडा , फरहताबाद पोलीस ठाणे ता. जि. कुलबर्गी राज्य कर्नाटक यांना दि. २८/०४/२०२२ रोजी ताब्यात घेऊन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

गुन्हयाचे तपासामध्ये कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार पो.नि. राहुल राख, सपोनि. अमोल आंबवणे, सपोनि नितिन बेंद्रे नेम-मध्यवर्ती गुन्हे शाखा, सपोनि ज्ञानेश फडतरे नेम- वालीव पोलीस ठाणे, पोहवा विकास यादव, गोविंद केंद्रे, शिवाजी पाटील, पोना संग्राम गायकवाड, राजाराम काळे, पोअं. महेश वेल्हे, सुशिल पवार सर्व नेम-मध्यवर्ती गुन्हे शाखा, पोहवा मनोज मोरे, महेश बोडके नेम- वालीव पोलीस ठाणे.

सदरील खुनाच्या गुन्हयाचा तपास करतांना सुरुवातीला कोणताही धागादोरा नसतांना तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हा घडल्यापासून वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सातत्याने मेहनत करुन व अत्यंत कौशल्यपुर्वक तपास करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणुन यातील आरोपीतांना अटक केली आहे. सदरच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांनी तपास पथकातील उपरोक्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे अभिनंदन करुन माहे एप्रिल २०२२ मधील ‘उत्कृष्ट गुन्हयाची उकल’ म्हणून पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मासिक गुन्हे आढावा बैठकीचेवेळी प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून गौरविले आहे.